# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. शुभदा भोंडे

सरस्वतीच्या वीणेमधूनी
सप्तसूर हे अवतरले ।
सातसुरांच्या मिलाफातूनी
नादब्रह्म जन्मा आले ॥

तालसुरांच्या संयोगातून
संगीत आकारा आले ।
सृष्टीमधल्या चराचरातून
विश्वही संगीतमय झाले ॥

मयुराच्या केकारवातूनी
षड्ज उमटला आरंभीचा ।
कोकीलकुजनातून प्रकटला
पंचम सूर तो आधाराचा ॥

कोमल आणि शुध्द सुरांचा मेळ
साधती निषाद, धैवत ।
गंधारही अन् ह्रषभ त्यातल्या पंक्ती मध्ये
सहजचि मिसळत ॥

एक तीव्र तो मध्यम केवळ
दावे अपुला बाज आगळा
सात सुरांच्या मेळाव्यातून
असा रंगतो गानसोहळा

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

आरोहातून, अवरोहातून
नटल्या विविधही
रागरागिण्या।
अंथरती अन्
स्वरलहरींच्या रेशिमस्पर्शी पायघड्यांना॥

भैरवातल्या सुरावटीने
दिवस उगवतो प्रसन्न हा
भीमपलासीच्या बंदिशीतून माध्यानीचा अस्त आहा ॥

यमनाच्या स्वर झंकारातून
सांजही ती अलवार खुले
निशांत करते आर्त भैरवी
संगीत मैफील अशी फुले॥

भिन्न थाट अन् रागांच्याही
हिंदोळ्यावर रसिक झुले।
श्रुती तृप्तीच्या अनुभूतीतून
आनंदाचा बहर फुले॥

विधी कृपेचे आंदण
साऱ्या चराचरातून
अंकुरले।
सूरसरींच्या वर्षावाने सकल रसिकजन हे भिजले ॥

Anahat Music Therapy